# महिलांच्या अधिकाराविषयी शासनाचे उपक्रम व त्यांची अंमलबजावणी

**कु. दिप्ती मधुकर मांगलकर**
संशोधक विद्यार्थिनी
राज्यशास्त्र विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ , नागपूर

**सारांश**

*स्त्रियांच्या अधिकारासाठी व स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी स्त्रीवादी चळवळीने स्त्री आंदोलने केली. स्त्री प्रश्न सोडवणूकीच्या दृष्टीने अलीकडील काळात विकसित होणारा एक विचार प्रवाह म्हणूनच या संकल्पनेकडे बघावे लागेल. 'स्त्रियांचे सबलीकरण' यात स्त्रियांना सत्ता, अधिकार देणे एवढेच अभिप्रेत नसून त्या अधिकारांच्या वापरासाठी त्यांना सक्षम व समर्थ बनविणे आवश्यक मानले आहे. सबलीकरण या संकल्पनेत सकारात्मक स्वातंत्र्याचा विचार आहे. याशिवाय काही बाबतीत हे सकारात्मक स्वातंत्र्य अर्थपूर्ण होण्यासाठी अडथळे दूरू करणे या स्वरूपाच्या उपायाचाही समावेश होतो. येथे स्त्रियांना केवल मोकळीक देणे एवढेच अभिप्रेत नसून विकासातील अडथळे दूर करण्यासाठी राज्याला सक्रीय भूमिका निभवावी लागते.*

***बीजशब्द** – सबलीकरण, स्त्री-चळवळ, योजना, रोजगार, कायदे*

**प्रस्तावना**

भारतात महिलांच्या अधिकाराविषयी आवाज बुलंद करण्याचे काम स्त्रीवादी चळवळीने सुरु केले. १९७५ पासून नवीन प्रश्न, नवीन संघटना व कार्याची नवीन उभारी आली असली तरी मुक्तीसाठीच्या स्त्री-चळवळीची आणि स्त्रीवादाची मुळे १९ व्या शतकापर्यंत मागे जातात. एका अर्थाने त्या आधीच्या काळामध्ये जातात. कारण स्त्रियांचे दुय्यम स्थान हा नेहमीच भारतीय समाजातील अंतर्विरोध राहिला आहे.

१९ व्या शतकापासून भारतात ज्या स्त्री-चळवळीचा उदय झाला. त्यांची स्त्री-मुक्तीच्या संदर्भात चिकित्सा करणे अगत्याचे आहे. १९५० च्या दशकातपर्यंत निर्माण झालेल्या विविध स्त्री-चळवळीपैकी दोन प्रमुख चळवळीची चर्चा अधिक प्रमाणात केली जाते. (१) सामाजिक सुधारणेच्या चळवळीला अंगभूत असलेली स्त्री-चळवळ आणि (२) जातीव्यवस्थाविरोधी चळवळीची अंगभूत स्त्री-चळवळ या दोन्ही चळवळी १९ व्या शतकात उदय पावल्या व काही प्रमाणात २० व्या शतकातही चालू राहिल्या व वाढल्या. अनिखी दोन मुलभूत स्त्री-चळवळी सांगता येतील. (३) ऑल इंडिया वूईमेंस कॉन्फरन्समध्ये सामावलेली स्त्रियांची स्वतंत्र चळवळ आणि (४) कम्युनिस्ट व समाजवादी नेतृत्वाखालीची स्त्री-चळवळ होय. तसेच स्वातंत्र्य चळवळीचा भाग म्हणून झालेली स्त्रियांची चळवळही महत्वाची ठरेल. या शेवटी

तीनही चळवळी प्रमुख्याने विसाव्या शतकात जन्मल्या व विकसित झाल्या.

समाजकारणातील, राजकारणातील सक्रीय सहभाग, स्वनिर्णय क्षमता, हक्क आणि अधिकाराची माहिती, न्याय मागण्यासाठी लढण्याचा आत्मविश्वास, आर्थिक निर्भरता आणि संघटनात्मक शक्ती प्रदर्शन इत्यादी स्त्रियांच्या सबलीकरणाची चिन्हे आहेत. १९७० ते १९८० च्या दशकापासून स्त्रियांच्या सबलीकरणाची संकल्पना जगभर रुजण्यास सुरवात झाली असून आता महिलांची आंदोलने वाढली आहेत, स्त्री प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेवून राष्ट्रीय आंतराष्ट्रीय स्तरावर त्याची नोंद घेण्यात आली आहे. स्त्री मुक्ती चळवळीने व नारीवादाने समकालीन निर्णय प्रकियेला प्रभावित करून सत्र सबलीकरणाला बल देणाऱ्या काही कायद्याना जन्म देवून शासनाला सक्रीय केले आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये**

१. महिला सक्षमीकरणासंदर्भात सरकारच्या भूमिकेचा अभ्यास करणे
२. महिला विकासासाठी असलेल्या सरकारच्या विविध योजनांचा अभ्यास करणे

**भारतीय शासनातर्फे महिला सबलीकरणाचे प्रयत्न** – नौरोबिच्या जागतिक परिषदेच्या ठरावावर भारत सरकारने कारवाई केली. 'राष्ट्रीय धोरण योजना १९८८-२०००' नौरोबिच्या ठरावाच्या अनुषंगाने विकास कार्यक्रमाच्या संबधित असलेल्या अनेक महिला कल्याण योजनांचा मसुदा आहे. 'श्रमशक्ती १९८८' या महिलांच्या स्वंयरोजगारविषयी आणि अनौपचारिक रोजगारविषयी अहवाल असून सद्याच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी त्यात अनेक सूचना आहेत. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा सुधारावा, हीच अपेक्षा आहे. १९९१ ते २००० या कालावधीकरिता बालिकाविषयक सार्क परिषदेत ठराव मंजूर झाला. त्यात बालिकेचे जीवनसंरक्षण व विकास या तिन्ही अंगाचा विचार करून धोरण आखण्यात आले.[१]

भारत सरकारने महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनपातळीवर धोरणात्मक बदल केले व तशाप्रकारे निर्णय घेऊन अंमलबजावणी केली. त्यामध्ये स्त्री प्रश्नांनसंबधी जागतिक पातळीवर असे प्रयत्न झाले तसेच राष्ट्रीय पातळीवर आणि विद्यापीठ पातळीवर यु.जी.सी.च्या माध्यमातून स्त्री अभ्यासाला सुरवात झाली. यु.जी.सी ने विद्यापीठ पातळीवर स्त्री अभ्यास केंद्र सुरु केले. त्या दृष्टीकोनातून आज देशात यु.जी.सी ने मान्यता दिलेली ३४ अभ्यास केंद्रे कार्यरत आहेत. पुणे विद्यापीठात १९८७ पासून हे अभ्यास केंद्रे कार्यरत आहे. ही ज्ञानशाखा म्हणून विस्तारित होण्याला आत तीन दशके होत आहे.

**स्त्री- अभ्यास केंद्र, पुणे** –

महाराष्ट्रातील दलित आणि भटक्या विमुक्त समाजातील स्त्रियांचे प्रश्न, महाराष्ट्रात जात, वर्ग, लिंगभेद संदर्भातील सामाजिक इतिहास (१८५० ते १९५०) हे विषय केंद्राने संशोधनासाठी निश्चित केले आहेत. स्त्री अभ्यास म्हणजे फक्त स्त्रियांनी स्त्रियांना स्त्रियांसाठी केलेला अभ्यास असे मर्यादित स्वरूप नाही. तर स्त्री – पुरुषांनी

एकत्र येऊन समाजातील एका घटकाने प्रश्न समजून घेणे आणि त्याच्यावर उपाय शोधणे, हा या अभ्यासक्रमाचा उद्देश आहे. सुशिक्षित, सुस्थापित स्त्रियांच्या परीघाबाहेर स्त्रियांसाठी काही तरी करण्यासाठी त्यांचे प्रश्न समजून घेण्यासाठी आणि स्त्रीवादी विचारांच्या आकलनासाठी या केंद्रातील अभ्यासक्रम नक्कीच उपयोगी आहे.[२]

याप्रकारे स्त्री अभ्यासात केंद्राने प्रमाणपत्र अभ्यासक्रम बरोबरच स्त्रियांच्या प्रश्नांबाबत अधिक जागरूकता दाखवून महिला जाहीरनामा प्रसिद्ध केल्यामुळे स्त्रियांना काम करतांना मार्गदर्शक ठरेल. स्त्री प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी काही विद्यापीठांनी अशा प्रकारची केंद्रे स्थापन केली. सर्वच विद्यापीठांनी अशा प्रकारची केंद्रे स्थापन करून महिला प्रश्नांबाबत जागरूकता दाखविली नाही, ही बाब खेदजनक आहे. तेव्हा तळागाळातील प्रश्न समजून घेऊन उपयोजना करण्यासाठी सर्वच विद्यापीठांनी स्त्री अभ्यास केंद्रे सुरु केली पाहिजेत.

याबरोबरच शासनाने महिलांसाठी विशेष विभाग स्थापन केला. मानव संसाधन विकास मंत्रालयाची १९८५ मध्ये निर्मिती केली. तसेच महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत महिलांसाठी वेगळे धोरणे आखून त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली. १९९३ मध्ये ७२ वि ७३ वि घटनादुरुस्तीने ग्रामीण व नागरी स्थानिक संस्थानातून महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षणाची तरतूद केली. ज्यामुळे महिलांचा राजकीय सहभाग जास्तीत जास्त वाढण्यास मदत होईल. १९९४ मध्ये महाराष्ट्र शासनाने महिला धोरण जाहीर केले. त्यानंतर २००१ हे वर्ष भारत सरकारने 'महिला सबलीकरण वर्ष' घोषित करून वर्षभर वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यानंतर २००१ मध्ये महिला धोरण जाहीर करून वेगवेगळ्या कायद्यात तरतुदी केल्या. तसेच शासनातर्फे विविध आयोगांची स्थापना करून त्यामार्फत प्रत्यक्ष कार्य करून महिलांच्या स्थितीमध्ये परिवर्तन घडवून आणण्यावर शासनाने भर दिला. शासनाने खालील प्रकारचे कायदे करून महिलांना संरक्षणाबरोबरच निर्भयतेने जीवन जगावे, अशा प्रकारच्या तरतुदी केल्या.

**राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना –**

केंद्र सरकारने महिलांच्या प्रश्नांचा अभ्यास करून धोरणे ठरविण्यासाठी ३१ जानेवारी १९९२ रोजी श्रीमती जयंती पटनायक यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली. या आयोगाच्या निर्मितीनंतर अनेक राज्यात राज्य महिला आयोगाची स्थापना झाली. त्याचाच एक भाग म्हणून 'महाराष्ट्र राज्य महिला आयोग' स्थापन झाला.

**राष्ट्रीय महिला कोष –**

केंद्र सरकारने असंघटीत आणि अनौपचारिक क्षेत्रात काम करणाऱ्या गरीब आणि असाहय्य महिलांना पतपुरवठा करण्यासाठी आणि त्यांची काटकसर वृद्धीगत करण्यासाठी ३० मार्च १९९३ मध्ये राष्ट्रीय महिला कोषाची स्थापना केली.

**नववी पंचवार्षिक योजना (१९९७ -२००२)**

नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये 'सामाजिक बदल आणि आर्थिक विकासासाठी महिलांचे सबलीकरण' हे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. महिलांना आर्थिक स्वावलंबी आणि स्वतंत्र करण्यावर भर देण्यात आला हे सर्व करण्यासाठी महिला बचत गटावर भर देण्यात आला. १९९७ ला महिला सबलीकरणासाठी एक समिती नेमण्यात आली होती. १९९९-२००० मध्ये नियोजन आयोगाने महिला सबलीकरणावर विशेष भर दिला. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार, हरियाणा, कर्नाटक आणि गुजरात या राज्यांसाठी 'ग्रामीण महिला विकास आणि सबलीकरण कार्यक्रम' सुरु केला. या कार्यक्रमाच्या उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी महिला बचत गटावर भर देण्यात आला होता.[3]

**स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (एस.जी.एस.वाय) -**

भारतात दारिद्र्य निर्मुलानासाठी अनेक योजना राबवल्या परंतु त्यांना फारसे यश आले नाही. म्हणून भारत सरकारने १ एप्रिल १९९९ पासून 'स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना' सुरु केली. ग्रामीण भागात लघुउद्योग सुरु करून ग्रामीण भागातील नागरिकांच्या क्षमतांचा वापर करून घेणे व त्यांची गरिबी हटविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेत एका घटकापेक्षा सामुहिक दृष्टिकोनावर भर देण्यात आला आहे. या योजनेत दारिद्र्यरेषेखालील लोकांना मदत करून दारिद्र्यरेषेच्या वर आणले जाते. स्वरोजगारीच्या सर्व क्षेत्रांना सामावून घेणारे अनेक उद्योग सुरु केले जातात. त्यामार्फत बचत गट, क्षमता वृद्धी, आधारभूत सोयींची निर्मिती, तंत्रज्ञान, पतपुरवठा आणि बाजरपेठ व्यवस्था केली जाते. उपलब्ध साधनसंपतीचा वापर करून व्यवसायाची निवड केली जाते. या योजनेत कर्जपुरवठा हा महत्वाचा भाग असून अनुदान हे सहाय्यकारी आहे. एकाच वेळी कर्ज देण्यापेक्षा टप्प्यात कर्ज देण्यावर भर असतो. लोकांच्या कौशल्यात वाढ करण्यासाठी प्रशिक्षण सुविधा केलेली असते. या योजनेची अंमलबजावणी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व पंचायत समिती मार्फत केली जाते.

**स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना –**

शहरी भागातील गरीब लोकांना स्वत:च्या रोजगार किंवा व्यवसाय उभारणीस मदत करण्याच्या उद्देशाने ही योजना सुरु केली आहे. या योजनेमार्फत 'शहरी भागातील महिला व मुले यांच्या विकासाची योजना' राबविली जाते. या योजनेत शहरी भागातील गरीब महिलांच्या बचत गट स्थापना करून त्यांना प्रकल्प सुरु करण्यासाठी खर्चाच्या ५० टक्के अनुदान किंवा जास्तीत जास्त १.२५ लक्ष रु. यापैकी जी रक्कम कमी आहे ती रक्कम अनुदान स्वरुपात दिली जाते.

२००१ हे वर्ष 'महिला सबलीकरण वर्ष' म्हणून जाहीर करण्यात आले. प्रत्येक महिन्यासाठी विशिष्ठ विषयावर भर देण्यात आला. यात महिलांसाठी मानवी हक्क, आर्थिक सबलीकरण, सामाजिक सबलीकरण, तंत्रज्ञान, शासन, शिक्षण, आरोग्य, आहार, उद्योजकता व

भवितव्याविषयी दृष्टी यांचा समावेश करण्यात आला होता.

**महिलांसाठी विविध कायदे –**

सामाजिक नियंत्रण व संचलन करण्यासाठी 'कायद्याची निर्मिती व अंमलबजावणी' करणे अत्यंत महत्त्वाचे असते. धोरणाला वास्तववादी स्वरूप देण्यासाठी व ते अंमलबजावणीक्षम बनविण्यासाठी कायद्याची भूमिका महत्वाची असते. धोरणात ठरविलेली उद्धिष्ट प्राप्त करण्यासाठी कायद्याचा आधार आवश्यक असतो. भारतातील महिला व बाल कल्याण विषयक कायद्याचे अवलोकन केले असता महिलांच्या सुरक्षा विषयक व त्यांच्या विकासात साहयभूत ठरतील अशा कायद्याची निर्मिती करण्यात आली. शासनाने महिलांसाठी केलेले काही कायदे असे आहेत की जे त्यांना सुरक्षा प्रदान करून देतात. त्यामध्ये प्रामुख्याने 'विशेष विवाह कायदा – १९५७;, 'हिंदू विवाह अधिनियम – १९५५', 'हुंडा प्रतिबंध कायदा – १९६१', 'बाल विवाह प्रतिबंध कायदा – १९५५' व 'अधिनियम दुरुस्ती – १९७६' तसेच 'हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम – १९५५' या कायद्याची महिलांच्या वैबाहिक जीवनाला सुरक्षितता प्रदान केली. सामान्यता: महिलांना त्यांच्या कार्याच्या संदर्भात 'प्रसुती सुविधा अधिनियम – १९६१' व 'समानतेवर अधिनियम – १९७६' या कायद्यांच्या माध्यमातून सुरक्षा प्रदान केली आहे.[४]

'महिला आयोग कायदा – १९९०' हा महिलांवरील अन्याय निवारण व प्रतिबंधासाठी उपयुक्त ठरला. विशेषतः महिलांना 'Medical Termination of Pregnancy 1971' Je prenatal – Digiagnostics Techniques (Regulation and Prerention of misuse) Act 1994 या कायद्यांनी त्यांना आरोग्य विषयक विशेष सुविधा प्राप्त करून देण्याचे अभिवचन दिले. याशिवाय अनेक कायद्यांनी महिला व बालकल्याणाच्या मार्गात सुविधा प्रदान केल्या. मात्र तरीही या कायद्यांचे पूर्णपणे पालन होत नाही.

**महाराष्ट्राचे महिला धोरण -**

महिला धोरणाच्या बाबतीत ज्याप्रमाणे संपूर्ण भारताची स्थिती आहे तशीच थोडी कमी-जास्त स्थिती महाराष्ट्राची आहे. कारण सन १९९४ पर्यंत म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर जवळ-जवळ ३४ वर्षापर्यंत राज्यात महिलांच्या बाबतीत ठोस धोरण नव्हते. राज्यात महिलांसाठी योजना होत्या. कल्याण विभाग होते. मुलींना, महिलांना, गर्भवती मातांना आरोग्य विषयक विविध लाभही मिळत होते. परंतु महिलांच्या सर्वांगीण कल्याणाचा भाग म्हणून परिपूर्ण धोरण किंवा योजना नव्हती. एक पुरोगामी राज्य म्हणून महिलांच्या बाबतीत कळवळा असल्याची परंपरा असलेल्या महाराष्ट्रात १९९४ पर्यंत धोरण तयार केले नाही. हे कटू सत्य आहे.

२० व्या शतकाच्या अखेरीस १९९४ मध्ये महाराष्ट्राने पहिले महिला धोरण जाहीर केले. ते संपूर्ण भारतातील पहिले महिला धोरण होते. या धोरणामध्ये स्त्रियांना मालमत्तेत हक्क मिळाले. वडिलांबरोबर आईचे नावही लावणे बंधनकारक झाले. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांविरोधात कायदेशीर समान हक्काची प्रस्थापना करणे,

स्त्रियांचा आर्थिक, राजकीय दर्जा सुधारणे, प्रसार माध्यमाचा परिणामकारक वापर यावर भर देण्यात आला.

मागील दशकात बचत गटांची संकल्पना उदयास आली. २००१ मध्ये महाराष्ट्र सरकारने दुसरे महिला धोरण घोषित केले. या धोरणात स्वयंसाहाय्यता बचत गटावर आधारित विकासाच्या योजनांना महत्व देण्यात आले. महिला ग्रामसभेची संकल्पना मांडण्यात आली. स्वयं साहाय्यता बचत गटाकडून महिला ग्रामसभेत, ग्रामकडून ग्रामसभेत आणि ग्रामसभेतून ग्रामपंचायती या क्रमाने स्त्रीयांचा राजकीय सहभाग हा विविध स्त्री संघटनांच्या तुलनेत अधिक आहे. आर्थिकदृष्ट्या स्त्री भक्कम झाल्यास तिचा राजकीय क्षेत्रातील सहभाग वाढविता येईल.[५] यावर या धोरणात भर दिला. १९९४ च्या महिला धोरणामुळे स्त्री सबलीकरण, स्त्री साक्षरता या संकल्पना उदयाला आल्या. २००१ नंतर बचत गटांची चळवळ गावोगावी फोफावली. परिणामी बचत गटांचे मेळावे. शिबिरे आदी मार्गाने स्त्री चळवळ लोकांपर्यंत पोहचत आहे.

शासकीय धोरणांमुळे अलीकडच्या काळात बिगर शासकीय संस्थाचे लोण खेडोपाडी पोहचले आहे. या संस्था विशिष्ट्य प्रकल्प पूर्ण करण्यापुरते कार्यक्रमाचे आयोजन होते. परिणामी स्त्री चळवळीला काही प्रमाणात आहोटी लागण्याची चिन्हे सिद्त आहेत. असा सूर उमटताना दिसतो.

**महिला धोरण (२००१) -**

१९९४ व १९९८ च्या दोन्ही महिला धोरणाच्या अंमलबजवणीच्या अनुभवावरून तिसऱ्या धोरणाचे प्रारूप तयार करण्यात आले. प्रामुख्याने सामाजिक व आर्थिक क्षेत्राबरोबरच राजकीय क्षेत्रातील महिलाच्या सहभागाला न्याय देण्यासाठी २००१ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने तिसरे महिला विषयक धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणाच्या प्रारंभीच म्हटले आहे की. 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पार्श्वभूमीवर अन्य सर्व संस्थामध्ये निर्णय प्रकियेत सहभाग वाढविण्यासाठी महिला आरक्षण, ग्रामसभेच्या धर्तीवर गाव महिला सभा. स्वयंसहायता गट निर्माण करून येत्या ५ वर्षात ५ लाख महिलांना सक्षम करण्याचे उद्दिष्ट्य आणि त्यापेक्षा महत्वाचे म्हणजे प्रत्येक शासकीय योजना आणि कार्यक्रम आखतांना महिलांना होणाऱ्या लाभाची निश्चित प्रारंभी करण्याची हमी राज्य शासनाने या धोरणाच्या निमित्याने दिली.' हे वर्ष २००१ च्या महिला धोरणाचे महत्वाचे वैशिष्ट्ये ठरले. या धोरणामुळे महिलांचा सर्वच क्षेत्रात सहभाग वाढविण्यावर भर देण्यात आला. पंचायत राज बरोबर नागरी स्थानिक स्वशासनातील अन्य संस्थाच्या निर्णय निर्धारणात त्यांना भागीदारी दिली. दुसरी महत्वाची बाब म्हणजे ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्याचा कालबद्ध कार्यक्रम देण्याबरोबरच त्यांच्या सामुहिकतेवर महिलाग्रामसभा, स्वयंसहाय्यता गट इत्यादीवर भर देण्यात आला.[६]

महाराष्ट्र शासनाने महिलांच्या विकासाच्या संदर्भात घेतलेल्या धोरणनिर्णयात ऐतिहासिक निणर्य ठरला. महिलांना सक्षम करून आपण राष्ट्र व समाजाला बलवान करू शकतो त्या दृष्टीने महिलांच्या धोरणात समावेश करण्यात आला. महिलांना केंद्रस्थानी मानून महिला धोरण २००१ ची आखणी केली. ती खालीलप्रमाणे आहे.

१.**महिला सक्षमीकरण योजना** – महिलांना सक्षम करण्यासाठी कोणते धोरणे, योजना आणि कार्यक्रम राबविण्यात येणार, त्याचा महिलांवरील परिणाम हे शासनाचा प्रत्येक विभाग त्याच्या कार्यक्रम अंदाजपत्रकात महिलांचे सक्षमीकरण स्पष्ट करील.

२.**महिलांसाठी सनद** – सर्व शासकीय, निमशासकीय स्थानिक संस्था तसेच शासनमान्य आणि शासनसाहयीत इतर संस्था महिलांना सक्षम करण्यासाठी कृतिकार्यक्रमाची सनद तयार करतील.

३.**महिला सक्षमीकरण निधी** – आदिवासी, अनुसूचित जाती-जमातींसाठी 'महिला घटक योजना' तयार करण्यात येईल. यामुळे महिलांच्या कार्यक्रमासाठी पुरेसा निधी मिळू शकेल.

४.**महिलांचा सहभाग** - महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यंत महिलांचे सक्षमीकरण होईल. त्यात ३० टक्के आरक्षण, सहकारी व शैक्षणिक संस्थांत प्रतिनिधित्व, ग्रामपातळीवर सहभागी इत्यादी.

५. **स्वयंसहाय्यित बचत गट** – स्वयंहाय्यित्ता बचत गटामार्फत आर्थिक विकास व सक्षमीकरण करण्यासाठी करण्यावर विशेष भर दिला जाईल. महिलांच्या आर्थिक विकासाची प्रमुख यंत्रणा म्हणून म.वि.म.ची पुनर्रचना करण्यात येईल.

६. **कृषी व ग्रामीण विकास क्षेत्रात महिलांची भूमिका** – ग्रामीण भागात विविध क्षेत्रात महिला मोलाची भूमिका बजावतात. या महिलांना सक्षम केल्यास मोठया प्रमाणात उत्पादकता वाढले व उत्पादनात वाढ होईल म्हणून कृषीविस्तार कार्यक्रमाचा ५० टक्के भाग महिलांना केंद्रस्थानी ठेऊन असेल.

७. **शिक्षण** – महिलांमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी जोमाने प्रयत्न केले जाईल. यासाठी स्वंयसहायता गटाच्या माध्यमाचा उपयोग केला जाईल. शाळांमधून मुलींची पटसंख्या वाढविण्याकरिता व मुलींची गळती थांबविण्यासाठी सर्वकष कार्यक्रम हाती घेतला जाईल. महिलांचे सबलीकरण तसेच त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी उच्च व तंत्रशिक्षणातील पदवी सर्वात महत्वाची असून राज्य शासनाने सर्व उच्च तंत्रशिक्षण पदवी अभ्यासक्रमात मुलींकरिता ३० टक्के आरक्षण देण्याचा ऐतिहासिक निर्णय १७ एप्रिल २००० मध्ये जाहीर केला. महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी व्यावसायिक शिक्षण

महत्वाचे असून त्याला राज्य शासनाकडून पूर्णपणे प्रोत्साहन देण्यात येईल.

८. **आरोग्य** – महिलांना स्वास्थसेवा उपलब्ध व्हाव्यात याकरिता एक व्यापक कार्यक्रम राबविण्यात येईल. त्यात प्रसूती, विविध रोग तपासणी, एच.आय.व्ही. बाधित इत्यादीबाबत महिलांना आरोग्यसेवा पुरविल्या जातील.

९. **प्रसाधनगृह सुविधा** – सार्वजनिक ठिकाणी प्रसाधनगृहाच्या अभावी महिलांचा मोठी कुचंबना होते. हा प्रश्न परिणामकारकपणे व कालबद्धरीतीने सोडविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था आणि संस्था महिलांसाठी येत्या तीन वर्षात प्रसाधनगृहे बांधणे कायद्याने बंधनकारक राहील.

१०. **पाणी पुरवठा** – पाणी भरणे, सरपण गोळा करणे यासारखे शारीरिक कष्टाचे जिकीरीचे व वेळखाऊ काम वर्षानुवर्षे महिलांना करावे लागत आहे. पाणी पुरवठा योजनांचे चुकीचे नियोजन आणि या योजनांच्या देखभालीचा अभाव यामुळे हा प्रश्न अधिकच बिकट बनतो म्हणून ग्राम पाणी समित्यावर ५० टक्के महिलांना प्रतिनिधित्व दिले जाईल.

११. **पाळणाघर सुविधा** – पाळणाघरे नसल्याने महिलांना बाहेर पडणे शक्य होत नाही. महिला बाहेर पडल्या तर मुलांकडे लक्ष घ्यायला कोणी नाही म्हणून गावपातळीवर पाळणाघराची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विशेष कार्यक्रम तयार केला जाईल.

१२. **व्यसन मुक्ती** – पुरुषांमधील व्यसनाधिनता हा गरीब आणि ग्रामीण महिलांच्या चिंतेत विषय आहे. म्हणून व्यसनमुक्ती हा महिलांचा सक्षम करण्याचा महत्वाचा कार्यक्रम आहे. ५० टक्के पेक्षा जास्त महिला मतदारांनी मागणी केल्यास दारू दुकान बंद करण्याच्या आदेशाची कडक अंमबजावणी करण्यात येईल. जिल्हा स्तरावर महिला दक्षता समितीची सहकार्याने दारूला आळा बसेल.

१३.**बालविवाह प्रतिबंध** – बालविवाह कायद्यानुसार प्रतिबंधित बालविवाहविरुद्ध जनजागृती, बालविवाह करणाऱ्या पालक, पुरोहित यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल.

१४.**वसतिगृह** – नौकरदार महिला, महाविद्यालयीन विद्यार्थिनी, इतर गरजू महिलांसाठी वस्तीगृहे बांधण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात येईल. तसेच महिला प्रतिनिधीसाठी स्वतंत्र शासकीय अतिथीगृहात राहण्याची व्यवस्था केली जाईल.

१५. **महिलांना मालमत्ता हक्क** - स्त्रियांच्या सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून 'महिलांना मालमत्तेचा हक्क' असे विधेयक मांडण्यात येईल. सदर विधेकात पतीचे घर व स्त्रीधन यावर हक्क प्रस्थापित करणे सोईचे होईल.

१६.**एकात्मिक बाल विकास योजना** – शालेयपूर्व शिक्षण व आरोग्य हे महत्वाचे उपक्रम घेतले जातात. अंगणवाडी सेविका

गावातीलच असल्यामुळे त्यांचा स्थानिक जनतेशी चांगला संबध असतो. विकासाच्या कामात उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या अंगणवाडी सेविकांसाठी शासन प्रोत्साहनपर योजना सुरु करेल.

**१७. एकात्मिक बाल विकास योजना** – शालेय शिक्षण व आरोग्य हे महत्वाचे उपक्रम घेतले जातात. अंगणवाडी सेविका गावातीलच असल्यामुळे त्यांचा स्थानिक जनतेशी चांगला संबंध असतो. विकासाच्या कामात उत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या अंगणवाडी सेविकांसाठी शासन प्रोत्साहनपर योजना सुरु करेल.

**१८.स्वंयसेवी संघटना** – महिलांच्या सक्षम करण्याच्या कार्यक्रमाची आखणी, अंमबजावणी यासाठी प्रत्येक स्तरावर सर्व क्षेत्रातील स्वंयसेवी संघटनांना सहभागी करून घेतले जाईल.

**१९.महिलांच्या सक्षमीकरणासाठी सहकार्य** – देशाचा विकास आणि प्रगती यासाठी महिलांचे सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध क्षेत्रात समन्वय साधण्यासाठी शासन प्रयत्न करील.

**२०.जाणीव जागृती** – महिला धोरण यशस्वी करण्यासाठी शासकीय जाणीव जागृती निर्माण करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी गाव, तालुका, जिल्हा पातळीवर विविध योजनांची माहिती देणारी केंद्र असावेत.

**२१. नियंत्रण** – मुख्यमंत्र्याच्या अध्यक्षतेखाली महिला सक्षमीकरण समिती स्थापन करण्यात येईल. या समितीत बैठक दर तीन महिन्यांनी होईल. या समितीला महिला विकासाबाबत करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रगतीची माहिती महिला व बालविकास मंत्री देतील.[७]

## संदर्भग्रंथ सूची


1. बेहरे. सुमन, (१९९८) : भारतीय समाजिक संस्था, भारतीय महिलांचा दर्जा, विद्या प्रकाशन, नागपूर, पृक्र. ४३.
2. गोरे, नीलम (१९९५) : समाज आणि महिला, प्रकाशक – स्त्री आधार केंद्र पुणे, पृक्र. ७०, ७१.
3. पं. नेहरू, (१९७५) : भारताचा शोध पाचवी आवृत्ती निकिता प्रकाशन दिल्ली, पृक्र. १२३.
4. घोटाळे, रा. ना. समाजशास्त्रीय संशोधन तत्व व पद्धती, मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९७, पृक्र. ३२०.
5. गोरडे, वासुदेव, 'महाराष्ट्र शासनाचे महिला धोरण, सन १९९४ ते २००१ एक प्रवास', यशमंथन महिला विशेषांक, महिला व बाल विकास विभागाचे महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई पुरुस्कृत, जानेवारी – मार्च २००२, यशवंतराव चव्हाण विकास प्रबोधिनी, पुणे, पुक्र. २९, ३०.
6. महाराष्ट्र शासन, महिलांसंबंधी धोरण, १९९४. पृक्र. १२३.
7. गोटे शुभांगी, पूर्वोक्त, पृक्र १३३-१४३.
8. कुलकर्णी बी. डी., ढमढरे एस. व्ही. (2007) : "अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती", डायमंड पब्लिकेशन्स, नागपूर.
9. बोधनकर सुधीर, अलोणी विवके, कुळकर्णी मृणाल (2014) : "सामाजिक संशोधन पद्धती", श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.